REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ | पुणें, बुधवार, तारीख ५ आक्टोबर, १९३८ | अंक ४०

## —किती आनंददायक !—

[१] 'स्कोडा' कंपनीला मशिनरीची सर्व रक्कम आपल्या सिंडिकेटनें दिली.

[२] सिंडिकेटची मशिनरी किंवा ऊंस कोठेहि गहाण अगर तारण दिलेला नाहीं.

[३] १९३९ सालीं चार लक्ष रुपयांची साखर तयार होणार.

[४] १९४० सालीं बारा लक्ष रुपयांची साखर तयार होणार.

[५] महाराष्ट्राच्या औद्योगिक यशाला मदत

व

**दरसाल साडेपांच टक्के व्याज व दोन वर्षांनीं डिपॉझिटची रक्कम परत.**

सविस्तर माहिती व डिपॉझिट फॉर्म खालील पत्त्यावर मिळतील.

**दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड,** २५७ बुधवार पेठ, पुणें २.

## वेदांमध्यें काय आहे ?

याबद्दल प्रत्येक हिंदूला माहिती असणें जरूर आहे. ही माहिती पुरुषार्थाच्या वेदाङ्कांत ( ऑक्टोबर १९३८ ) वाचकांना मिळूं शकेल. यांत प्रख्यात विद्वान् महाराष्ट्रीयांचे विद्वत्ताप्रचुर लेख प्रसिद्ध होणार असून, २०० पृष्ठांच्या या विशेषांकाची किंमत २ रु. आहे; पण ३ रु. पाठवून ग्राहक होणारांस वर्गणींतच हा अंक मिळेल. पुरुषार्थाचा नमुना अंक व ग्राहक होणारांसाठी फायदेशीर अभिनव योजना मागवा.

व्यवस्थापक—पुरुषार्थ, औंध, ( जि. सातारा )

## फर्म. कंपनी आणि सोसायटी

यांचा प्रचलित कायदा काय आहे यासंबंधीं नागपुरचे प्रसिद्ध कायदानिपुण वकील श्री. के. बा. गजेंद्रगडकर यांनीं लिहिलेली लेखमाला "न्यायबोध" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः सुरू आहे. त्याचप्रमाणें मुंबई हायकोर्टाचे निवाडे व वेळोवेळीं होणारे प्रांतिक कायदे प्रत्येक अंकांत प्रसिद्ध होतात. फर्म, कंपनी आणि सोसायटी यासंबंधीं येत असलेली श्री. गजेंद्रगडकर यांची लेखमाला मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें मासिक अवश्य संग्रहीं ठेवा. वा. व. ट. ख. सह फक्त ५ रु; नमुना अंकासाठीं सात आण्यांचीं तिकिटें पाठवा.

मॅनेजर,

"न्यायबोध" मासिक, नागपूर शहर.

# विविध माहिती

### अंड्यांचें उत्पादन वाढविण्याची आवश्यकता

ग्रेट ब्रिटनमध्यें प्रत्येक कोंबडी दरसाल सरासरीनें २६० अंडीं देते. हिंदुस्थानांतील कोंबडी सालीना सरासरीनें फक्त ४० अंडीं घालते. हें प्रमाण वाढविल्यास कोंबड्यांचा धंदा येथें किफायतशीर होणें शक्य आहे.

### कोंबडी तज्ञ

हिंदुस्थान सरकारच्या इझतनगर येथील इंपीरिअल व्हेटरिनरी रिसर्च इन्स्टिट्यूटनें कोंबड्यांच्या धंद्यासंबंधीं संशोधन चालविलें आहे. तें काम मि. मॅक्डोनल्ड ह्या एका इंग्रज तज्ञाकडे सोपविण्यांत यावयाचें असून, हा तज्ञ हिंदुस्थानांत येऊन दाखलहि झाला आहे.

### जमीन महसुलाचें उत्पन्न

मुंबई प्रांताचें जमीन महसुलाचें वार्षिक उत्पन्न तीन ते साडेतीन कोटि रुपये असतें. १९३८-३९ सालांतील वसुली साडेतीन कोटीपर्यंत जाईल, असा अदमास आहे. गेलीं दोन वर्षे जमीन महसुलाची वसुली अनुक्रमें ३ कोटि, २३ लक्ष रुपये आणि ३ कोटि, २९ लक्ष रुपये झाली होती.

### हें सर्व एका तासांत !

एका तासाचे अवधींत सर्व जगांत मिळून एकूण १४ हजार तारा पाठविल्या जातात, ११½ लक्ष पत्रें पोस्टाच्या पेट्यांत पडतात, ६ कोटि वर्तमानपत्रें छापलीं जातात आणि १,२५० विवाह साजरे होतात. प्रत्येक साठ मिनिटांचे कालावधीमध्यें ५,४४० अर्भकें जन्मास येतात आणि ४,६५० लोक मरण पावतात. हिंदुस्थानांतील लोकसंख्येपैकीं १२० लोक प्रत्येक तासास हिंवतापानें मृत्युमुखीं पडतात.

### लोकलबोर्ड कायद्यांत दुरुस्ती

लोकलबोर्डास त्यांचे हद्दीमध्यें येणाऱ्या मालावर जकात घेण्याचा अधिकार असला, तरी जकात न देणाराचा माल त्यांस ताब्यांत घेतां येत नाहीं. ह्यामुळें जकात चुकविणारांचें फावतें आणि लोकलबोर्डाचें उत्पन्न बुडतें. ही अडचण दूर करण्याकरितां लोकलबोर्ड कायद्यांत दुरुस्ती करण्याचें सरकारनें ठरविलें आहे.

### खनिज पदार्थांचें उत्पादन

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या खाणींतून खणून काढलेल्या खनिज पदार्थांची एकूण किंमत १९३७ सालीं २१ कोटि, ४३ लक्ष रुपये, म्हणजे १९३६ सालांतील उत्पादनाच्या किंमतीपेक्षा ५ कोटि, ५९ लक्ष रुपये अधिक भरली. ७ कोटि, ८१ लक्ष रुपयांच्या कोळशाचें उत्पादन झालें; ४ कोटि, ५२ लक्ष रुपयांचें मॅंगेनीज निघालें आणि ३ कोटि, ४ लक्ष रुपयांचें सोनें खणून काढण्यांत आलें. १ कोटि, ३७½ लक्ष रुपयांचें पेट्रोल निघालें.

### ब्रिटिश रेल्वेजचें भांडवल

ब्रिटिश रेल्वेजमध्यें १,५५० कोटि रुपयांचें भांडवल गुंतलेलें असून तें ८½ लक्ष भागीदारांच्या मालकीचें आहे.

### मुंबई प्रांतांत म्हैसुरी तज्ञ

मुंबई प्रांतांतील माढघर, गोकाक आणि भंडारदरा येथील विद्युद्गृहांवर देखरेख करण्यासाठीं म्हैसूर सरकारचे इंजिनियर, डॉ. रामप्रसाद अय्यंगार, ह्यांस सहा महिनेपर्यंत नेमण्यास म्हैसूर सरकारनें मान्यता दिली आहे.

### सॅकारिन

सॅकरिन हें डांबरापासून तयार होतें आणि त्यास शास्त्रीय परिभाषेंत ' ऑर्थो बेन्झॉइसल्फिनाइड ' असें म्हणतात. उंसापासून बनविलेल्या साखरेचे मानानें तें तीनशे पट गोड असतें. त्याचा शोध १८७९ सालीं लागला.

### मेवामिठाईचे ग्राहक कमी होऊं लागले

ग्रेट ब्रिटनमध्यें दरसाल सुमारें ७० कोटि रुपयांची मिठाई खपते. ह्यांत चोकोलेट, लिमलेट इत्यादींचा समावेश होतो. मिठाईच्या धंद्यांत ९० हजार लोक आहेत. जननसंख्या कमी होत चालली असल्यामुळें मेवामिठाईचा खप वाढूं शकत नाहीं, त्याचप्रमाणें युद्धाच्या तयारीवरील खर्चाचें प्रमाण वाढलें म्हणजे त्यामानानें मिठाईवर खर्च कमी होतो, अशी मिठाईच्या उत्पादकांची तक्रार आहे.

### शरीरसंरक्षक दलांत मराठ्यांचा समावेश

मुंबई गव्हर्नरांच्या शरीरसंरक्षकांचे दलांत शीख आणि मुसलमान ह्यांचा भरणा आहे. ह्या प्रांतांतील मराठ्यांस त्यांत प्राधान्य मिळावें अशी आज कित्येक वर्षांची मागणी आतां पुरी होणार आहे. १ ऑक्टोबर रोजीं १८ मराठ्यांची अशा रीतीनें निवड झाली, त्यांतील सर्वांची उंची ५½ फुटांहून अधिक असून कांहींची उंची ६ फुटांचे वर आहे.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. ८ आ. ३ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं १, १६, २५,००० रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं,त्यावर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. ८ आ. ३ पै इतका पडला.

### औद्योगिक बांधे

जानेवारी ते मार्च, १९३८ ह्या मुदतींत सबंद हिंदुस्थानांत मिळून कारखानदार आणि कामगार ह्यांचेमध्यें ८९ नवीन बांधे निर्माण झाले. १३ बांध्यांचा निकाल कामगारांचे बाजूनें झाला, ३३ बांध्यांमध्यें कामगारांस थोडेंफार यश आलें आणि ४९ बांध्यांत कारखानदार यशस्वी झाले. वरील तिमाहीचे प्रारंभीं १३ बांधे चालू होते आणि तिमाहीचे अखेर ७ बांधे चालू राहिले.

### ५० लक्ष रुपयांचे विदेशी हातरुमाल

हिंदुस्थानामध्यें दरसाल सुमारें ५० लक्ष रुपये किंमतीच्या हातरुमालांची आयात होते, त्यांपैकीं बहुतेक सर्व जपानी असतात. सध्या जपानी मालाची किंमत १५ ते २० टक्क्यांनीं वाढली असल्यामुळें त्याची आयात मंदावली आहे.

### ॲबिसिनिया जिंकून इटलीस काय मिळालें !

ॲबिसिनियामध्यें अद्याप एक लक्ष इटालियन सैनिक असून एक लक्ष स्थानिक सैनिक इटलीचे स्वामित्वाखालीं लढण्यास सज्ज आहेत. सुमारें २०० ते ३०० विमानेंहि प्रसंग उद्भवल्यास तयार आहेत. इटलीनें ॲबिसिनिया जिंकण्यासाठीं आणि तो आपल्या प्रभुत्वाखालीं ठेवण्यासाठीं केलेल्या खर्चाचे मानानें त्या देशापासून इटलीस अद्याप कांहींच फायदा होऊं लागलेला नाहीं.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रुपये |
|---|---|
| १८-९-३८ ते २४-९-३८ | १८,९१,१२० |
| २५-९-३८ ते १-१०-३८ | १३,३०,०५४ |
| २१-९-३१ ते १-१०-३८ | ३,१९,६५,१७,५३६ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ४८२ | धंदे--विदेशीयांच्या प्रवेशावर बंधनें ... ... | |
| २ आर्थिक उन्नति आणि सरकार ... ... | ४८३ | ६ दौंड पेटा अॅ. डे. असोसिएशन ... | ४८७ |
| ३ खेडेगांवांची सुधारणा आणि सहकारी चळवळ | ४८४ | ७ मुंबई सरकारच्या पुरवणी मागण्या ... ... | ४८८ |
| ४ खेडेगांवी उद्योगधंद्यांच्या वाढीस सहाय ... | ४८४ | ८ स्वदेशी चित्रपटांची वाढ | ४८८ |
| ५ स्फुट विचार ... ... | ४८५ | ९ धरणीकंप फंडाचा -- विनियोग ... ... | ४८८ |
| युद्धाचे वातावरण निवळलें युद्धसंभवाचा रोखे बाजारावर परिणाम--उद्योग मंत्र्यांची परिषद्--वहातुकीचे दर आणि उद्योग- | | १० खऱ्या सहकाराच्या पुरस्काराची आवश्यकता | ४८९ |
| | | ११ पुना स्कूल ऑफ कॉमर्स | ४९० |
| | | १२ निवडक बाजारभाव... | ४९१ |



# अर्थ

बुधवार, ता. ५ आक्टोबर, १९३८


## आर्थिक उन्नति आणि सरकार

हिंदी जनतेचें रहाणीचें मान निकृष्ट दर्जाचें आहे, तें सुधारल्यावांचून राष्ट्राची उन्नति होणें अशक्य आहे. ही उन्नति लोकांची सर्वसाधारण कार्यक्षमता आणि त्यांचें सुव्यवस्थित आर्थिक संघटन ह्यांवर अवलंबून आहे. मूलग्राही तत्त्वाच्या आणि तुलनात्मक दृष्टीनें पाहिलें असतां शेतकरी, कारागीर आणि व्यापारी ह्यांची मिळकत हिंदुस्थानांत अत्यंत अपुरी आहे ह्यांत शंका नाहीं. मिळकत समाधानकारक आहे किंवा नाहीं, हें कशावरून ठरवावयाचें? धनोत्पादकांची कार्यक्षमता टिकावी, त्यांच्या कुटुंबांचें नीट पोषण व्हावें आणि त्यांच्या मुलांची चांगली वाढ होऊन त्यांच्या जीवनास स्थैर्य प्राप्त व्हावें हें ध्येय पुढें ठेवतां येईल. समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीनें कुटुंबव्यवस्था हितावह असून तरुण पिढी बलवान व कार्यक्षम व्हावी ह्यासाठी तरतूद करावी लागेल. केवळ चालू मागणी-पुरवठ्याच्या दृष्टीनें अल्प वेतनावर लोकांनीं काम करावें हें समाजाच्या अंतिम फायद्याचें होणार नाहीं. आर्थिक मंदीचा आणि वाढत्या बेकारीचा परिणाम मिळकत, वेतन आणि मजुरी ह्यांचे दर उतरण्यांत झाला आहे. ही परिस्थिति नव्या पिढीच्या जीवनास हानिकारक झाल्यावांचून रहावयाची नाहीं. आरोग्याची हयगय, पोषक अन्नाचा अभाव, शिक्षणाची आबाळ इत्यादि अनिष्ट गोष्टींचा सर्वत्र प्रादुर्भाव होणें हें हीनावस्थेचें लक्षण आहे. नवीन पिढी जोमदार आणि सबळ व्हावी, ह्याकरितां पुढारलेले देश शक्य ती खटपट करीत आहेत आणि आपल्या प्रजाजनांच्या रहाणीच्या मानावर कुटुंबांतील मुलांच्या वाढत्या संख्येचा प्रतिकूल परिणाम होऊं नये ह्याविषयीं खबरदारी घेत आहेत. मिळवत्या मनुष्याची प्राप्ती कायम राहून घरांत खाणारांचीं तोंडें वाढलीं म्हणजे अर्थातच त्याच्या मिळकतींतून प्रत्येकास मिळावयाचा वांटा कमी होतो. हें असें होऊं नये आणि मुलांच्या वाढीकडे पूर्ण लक्ष देण्यास पैशाची अडचण येऊं नये, ह्याकरितां कामगारांस त्यांच्या मुलांचे संख्येस अनुसरून भत्ता देण्याची पद्धति कित्येक देशांत अंमलांत आहे. कामगारांस इतर अनेक प्रकारांनीं सरकार कायदेशीर संरक्षण देतें आणि त्यांच्या हिताची जोपासना करतें. बेकार, आजारी आणि वृद्ध नागरिकांचें पोषण करण्याची जबाबदारी ज्या देशांत राष्ट्रीय सरकारांनीं घेतलेली आहे, त्या देशांत वरील पद्धतीच्या भत्त्यांचें तत्त्व स्वीकारलें जाणें विशेष कठीण नाहीं. फ्रान्स, बेल्जम, इटली,जर्मनी, हॉलंड, स्वित्सरलंड, इत्यादि अनेक देशांत मुलांबद्दल द्यावयाच्या भत्त्याची व्यवस्था करण्यांत आलेली आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें अशी तरतूद नाहीं; ती लवकर करण्यांत यावी असा तेथें जोरानें प्रचार चालू आहे. पहिल्या मुलास १६ रुपये, दुसऱ्या मुलास ९ रुपये, तिसऱ्या मुलास ५ रुपये, अशा उतरत्या दरानें सरकारनें कुटुंबांस सहाय करावें अशी एक सूचना पुढें आली आहे. तीन मुलें असणारांसच मदत देण्याचें ठरवून ही योजना उलटीकडून आधीं हातीं घेतल्यास ती प्रारंभींच फार खर्चाची होणार नाहीं आणि सुदृढ मुलांचे स्वरूपांत राष्ट्रास मिळणारा फायदा हा पैशाचे स्वरूपांत त्यास द्याव्या लागणाऱ्या रकमेचे मानानें अनेक पटींनीं अधिक होईल असें सांगण्यांत येत आहे. सामाजिक प्रगतीची जबाबदारी सरकारनें स्वतःवर घेऊन आपल्या तिजोरींतून त्यासाठी खर्च करण्याची आतुरता प्रगतिप्रिय पाश्चात्य देशांत आढळते; हिंदुस्थानांत अशा प्रकारच्या योजना तात्त्विक चर्चेच्याहि कक्षेंत येणें अत्यंत कठीण आहे. शेतकऱ्यांच्या रहाणीचे मानांत सुधारणा होणें आवश्यक आहे, परंतु त्याविषयीं प्रत्यक्ष खटपट किती आणि कोठें होत आहे? कामगारांच्या बाबतींत जगांतील इतर देशांच्या धर्तीवर कांहीं कायदे करण्यांत आले आहेत, तथापि त्यांचे कामाचे तास मर्यादित करून अपघातांबद्दल त्यांस थोडीफार नुकसानभरपाई करण्यापलकिडे अद्याप विशेष कार्य झालेलें नाहीं. हिंदी कामगारविषयक कायद्यांचा उगम लँकेशायरच्या गिरणीवाल्यांच्या चळवळींत झाला, हें लक्षांत घेतलें असतां त्यासंबंधांतील योजनांचें स्वरूप ध्यानांत येईल.

हिंदुस्थानांतलि सामान्य जनतेस पोटभर अन्न खावयास मिळण्याचीच जेथें मारामार, तेथें भावी पिढीचा विचार होण्यास सवड आहे कोठें? मिळेल तें वेतन स्वीकारणें हाच मार्ग, नाइलाजानें कां होईना, एकदां ठरल्यावर योजनात्मक धोरणाचा प्रश्नच उरत नाहीं. तथापि, ह्या दुःस्थितीवर उपाययोजना करणें अगत्याचें आहे. ती शीघ्रपरिणामकारी नसली तरी दूरदर्शीपणानें आंखली गेल्यास अखेरीस इष्टफलदायी झाल्यावांचून रहावयाची नाहीं. ह्यासाठी स्थानिक उद्योगधंदे सुधारून परदेशांत जाणारा संपत्तीचा ओघ थांबला पाहिजे. शेतीचा धंदा किफायतशीर झाला पाहिजे. आणि व्यापाराच्या पद्धतींत सुधारणा घडून आली पाहिजे. ह्या संबंधांत प्रांतिक सरकारांचे यत्न चालू आहेत, ते जोमानें आणि अखंड टिकून राहतील आणि मध्यवर्ती सरकार आपलें धोरण सहानुभूतीचें ठेवील तर हिंदुस्थानासहि प्रगतीचा मार्ग दिसूं लागेल.

### "सुख-सवलत तिकिटें",

दिवाळीकरितां बी. बी. अॅन्ड सी. आय. रेल्वेनें झोन तिकिटें काढलीं आहेत. ह्या तिकिटांचें नांव "सुख व सवलत" असें ठेवण्यांत आलें आहे. उतारूंस सवलती सढळपणें देण्यांत आल्या असून त्यामुळें प्रवास सुखकर होईल असें वरील नांव सुचवितें.

## खेडेगांवांची सुधारणा आणि सहकारी चळवळ

( ले:— श्री. के. जी. प्रभु, एम. ए., जी. डी. ए., असिस्टंट रजिस्ट्रार, को. सो., सेंट्रल डिव्हिजन, पुणें. )

खेडेगांवांची व्यापक प्रमाणावर चिरस्थाई सुधारणा केवळ सरकारी अधिकाऱ्यांच्या प्रयत्नानें होणें शक्य नाहीं; त्यास चांगल्या, बिनअधिकारी लोकांचेंहि हार्दिक सहकार्य पाहिजे. खेडेगांवांत अशा प्रकारच्या पुढाऱ्यांचा अभाव आहे; तेव्हां असे लायक लोक तयार करणें हें खेडेगांवांच्या सुधारणेच्या मार्गांतील पहिलें पाऊल आहे. त्याचप्रमाणें, खेडेगांवांतील लोकांस त्यांच्या हक्कांची आणि जबाबदारीची जाणीव करून देण्यांत आली पाहिजे. केवळ सरकारी अधिकारी हें कार्य करूं शकणार नाहींत; शहरांतील शिक्षित आणि व्यापक दृष्टीच्या लोकांस खेडेगावांकडे आकर्षितां आलें तर कामास मदत होईल. खाली सुचवल्याप्रमाणें सरकारनें सहाय केल्यास, हें शक्य होईल:—

दरसाल शाळा–कॉलेजांतून हजारो तरुण बाहेर पडतात आणि त्यांपैकी फारच थोड्यांस सरकारी अगर खासगी नोकरी मिळते. नोकरी खेरीज इतर व्यवसायांत पडण्यास लागणारें धैर्य आणि इतर गुण त्यांचे जवळ नसतात. शेतकीची पदवी धारण करणारे लोकहि प्रत्यक्ष शेतीच्या प्रगतीस हातभार न लावतां कारकुनी करीत असलेले कित्येक प्रसंगीं आढळतात. हिंदुस्थान हा शेतीप्रधान देश असूनहि इतर देशांचे मानानें तो शेतींत मागसलेला आहे. बेकार सुशिक्षितांच्या हुशारीचा फायदा देशास मिळून बेकारांची स्वतःचीहि सोय व्हावी ह्या दृष्टीनें सरकारनें त्यांचे गट बनवून त्यांस शेतीकडे वळवावें. शहरांत वसति करणाऱ्या पेन्शनरांसहि ह्या योजनेंत जागा देतां येईल. सरकारच्या शेतकी, औद्योगिक आणि सहकारी खात्यांनीं मिळून ह्याबाबत एक योजना आखावी. प्रत्येक तालुक्यांत योग्य अशी जमीन मिळण्यास अडचण पडणार नाहीं. ह्या "कॉलनी" मधील सुशिक्षितांमध्यें, खेडेगांवांचे नेते म्हणून काम करण्यास लायक लोक सहज सांपडतील आणि हीं केंद्रें म्हणजे खेडेगांवांच्या सुधारणेचीं प्रात्यक्षिकेंच होऊन बसतील. वरील योजनेस सरकारचीं खातीं खालील प्रकारें मदत देऊं शकतील.

( १ ) मुलकी खातें हें योग्य ठिकाणीं चांगल्या जमिनी सवलतीच्या अटींवर देऊं शकेल.

( २ ) शेतकी खातें हें केंद्रांतील शेती–सुधारणा घडवून आणील.

( ३ ) उद्योग खातें उद्यम धंदे सुचवून उत्पन्न वाढविण्याचे मार्ग दाखवील.

( ४ ) वरील योजना सहकारी पद्धतीनें व्यवहारांत आणण्याची योजना सहकारी खातें आखून देईल.

खेडेगावांत भासणाऱ्या अनेक अडचणी दूर करण्यासाठी आणि शेतकऱ्यांची सर्वांगीण उन्नति घडवून आणण्याकरितां 'मल्टिपर्पज' सोसायटी हीच श्रेयस्कर ठरेल. अशा सोसायट्यांची सरसकट स्थापना न करतां, प्रथम कांहीं केंद्रांची त्यासाठी निवड करणें युक्त होईल. तेथें त्या यशस्वी झाल्या म्हणजे इतरत्र त्यांचा प्रसार होणें सोपें जाईल. शेतीच्या मालाचा उठाव, बीं, शेतीचीं उपकरणें आणि इतर तत्सम गोष्टी ह्याहि मल्टिपर्पज सोसायट्यांच्या आणि मध्यवर्ती विक्री-संस्थांच्या कक्षेंत येतील. ग्रामसुधारणेसाठी कांहीं आर्थिक मदत करावयाची, ती मल्टिपर्पज, बेटर लिव्हिंग अगर बेटर फार्मिंग ह्यांसारख्या सहकारी संस्थांमार्फतच करणें योग्य होईल; कारण शेतकऱ्यांची उन्नति त्या जास्त चांगल्या रीतीनें घडवून आणतील. अशा रीतीनें ह्या संस्थांसहि मजबुती येईल आणि आर्थिक मदतीचेंहि योग्य चीज होईल.

## खेडेगांवीं उद्योगधंद्यांच्या वाढीस सहाय

लहान हस्तव्यवसायांस व खेड्यांतील उद्योगधंद्यांस मदत व्हावी त्या धंद्यांची प्रगति व्हावी:आणि ह्या धंद्यांसंबंधीं शिक्षण मिळावें म्हणून मुंबई सरकारनें, त्यांजकडे ग्रामोद्योग संघानें पाठविलेल्या योजनांना संमति देऊन चालू वर्षाच्या खर्चासाठीं वीस हजार रुपये मंजूर केले आहेत. ह्या योजनेंत खालील गोष्टींचा समावेश होतोः—

( १ ) हातानें कागद बनविण्याचे क्रियेसंबंधीं व तेल घाणीसंबंधीं शिक्षण घेण्यासाठी वर्धा येथें विद्यार्थी पाठविणें.

( २ ) कर्नाटक भागांत काथ्यापासून दोरखंड तयार करण्याची कृति व बटनें तयार करण्याची कृति प्रयोगासह शिकविणें.

( ३ ) ओरिसा प्रांतांतून तज्ञ आणून त्यांचेमार्फत जनावरांच्या शिंगाचे निरनिराळे पदार्थ बनविणें.

( ४ ) वर्धा येथें ग्रामोद्योग संघानें सुधारून तयार केलेल्या तेल घाणीप्रमाणें इतर गांवीं तशा तेल घाण्या कोणी चालू करील तर प्रोत्साहन म्हणून त्यांना देणगी देणें व त्याचप्रमाणें बैलानें चालणाऱ्या दळणाच्या चक्क्यांस मदत करणें.

( ५ ) इलाख्यांत ज्या ठिकाणीं कागद हातानें तयार होत आहे तेथील कागदाच्या कारखान्यांचे दुरुस्तीसाठी मदत देणें व तज्ञ माणसांकडून कागदांत सुधारणा करण्यासाठी मधून मधून माहिती देणें.

( ६ ) शिंदी, ताड, माड, नारळ ह्यांचे रसापासून गूळ बनविण्याची क्रिया शिकविणें व प्रयोग करणें. ह्याबाबतींत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ति देणें.

ग्रामोद्योग संघानें ही जी सरकारच्या मदतीनें योजना हातीं घेतली त्यांत मुख्यतः धंद्यांचें शिक्षण देण्याकडे शास्त्रीय माहिती मिळविण्याकडे व हल्लीच्या साधनसामुग्रींत सुधारणा करण्याकडे प्रामुख्यानें लक्ष दिलें आहे. अशा प्रकारें कार्य हातीं घेतलें तर लहान लहान धंद्यांची वाढ होऊन तेथल्या तेथें लोकांना धंदेशिक्षण घेतां येईल, असा संघास विश्वास वाटत आहे.

वैकुंठ ल. मेहता
सभासद
व्यवस्थापक मंडळ
अ. भा. ग्रा. संघ.

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्भास्त ठिकाण.

पूना
गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७१ : लक्ष्मी रोड–गणपति चौक–पुणें

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

# स्फुट विचार

### युद्धाचें वातावरण निवळलें

इंग्लंडचे मुख्य प्रधान, मि. चेंबर्लेन, हिटलरशी दोन मुलाखती करून हातांत शांततेचा करार घेऊन स्वदेशीं परतले, तेव्हां जागतिक शांततेचे संरक्षक म्हणून ब्रिटिश जनतेनें त्यांचें उत्साहपूर्वक आणि साभार स्वागत केलें. महायुद्धानें होरपळून निघालेल्या कोणत्याहि राष्ट्रास युद्धाची पुनरावृत्ति नको आहे व प्रत्यक्ष जर्मनीमध्येंहि युद्धाविषयीं औत्सुक्य नाहीं ही गोष्ट झेकोस्लोव्हेकिया प्रकरणाच्या निकालावरून स्पष्ट झाली आहे. ह्यामुळें युरोपांत युद्ध होत नाहीं ही बातमी ऐकून जगभर सर्व लोकांस हायसें वाटलें असल्यास आश्चर्य नाहीं. पण मि. चेंबर्लेन ह्यांनीं शांततेचा विजय मिळविला ह्यांतलें रहस्य काय ? इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांनींच महायुद्धाचे अखेरीस झेकोस्लोव्हेकिया हें स्वायत्त आणि संघटित राष्ट्र बनवलें आणि त्या नवीन राष्ट्रानें वीस वर्षेपर्यंत आपलें स्वतंत्र आयुष्य मानानें कंठलें. त्याच्या स्वातंत्र्याच्या रक्षणाची जबाबदारी राष्ट्रसंघ आणि त्याचे नेते, इंग्लंड व फ्रान्स ह्यांचेवरच होती. जर्मनीनें आपलें लष्करी सामर्थ्य वाढवून झेकोस्लोव्हेकियाशीं दांडगाई आरंभली तेव्हां ह्या नवीन राष्ट्रास सहाय देणें हें त्यांचें कर्तव्य होतें. जर्मनीनें युद्धाचा धाक दाखवून झेकांचा प्रदेश आक्रमण्याचें ठरवलें. तेव्हां त्यांच्यापुढें नमतें घेऊन मि. चेंबर्लेन ह्यांनीं प्रथम फ्रान्सच्या संमतीनें झेकोस्लोव्हेकियावर जर्मनीच्याच मागण्या लादल्या आणि तो देश जणूं काय गुन्हेगार आहे ह्या भूमिकेनें म्यूनिच येथील शेवटच्या वाटाघाटींत त्याच्या प्रतिनिधींस स्थानहि दिलें नाहीं. हा विजय कोणाचा ? इंग्लंड आणि फ्रान्स यांचा का जर्मनीचा ? युद्ध टळलें खरें; पण लहान, स्वतंत्र राष्ट्रांस स्वतःच्या जीविताच्या रक्षणाची शाश्वति उरली नाहीं आणि लष्करी दांडगाईस उत्तेजन मिळालें. जर्मनीचा हेतु तडीस नेण्यास मि. चेंबर्लेन ह्यांनीं सहाय केलें असतां हिटलरनें त्यांचें ऐकण्यांत कांहींच बिघडत नव्हतें. आपणांवर बळजबरी झाल्यामुळेंच केवळ आपण म्यूनिच येथें स्वतःच्या संमतिवांचून निश्चित झालेल्या योजनेस नाइलाजानें रुकार दिला ही झेकोस्लोव्हेकियाची घोषणा ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

### युद्धसंभवाचा रोखेबाजारावर परिणाम

ऑगस्ट १९१४ नंतर आतापर्यंत गेल्या आठवड्याइतका कठीण साप्ताहिक कालखंड मुंबईच्या रोखे बाजाराच्या अनुभवास आला नाहीं. युरोपांतील परिस्थिति विकट होत चालली आणि युद्ध टळत नाहीं हें वाटूं लागलें तेव्हां रोखे बाजार हादरला आणि सरकारी रोखे आणि मंडळ्यांचे भाग ह्यांच्या किंमती कोसळून पडल्या. सर्वत्र अनिश्चिततेचें वातावरण पसरून जो तो आपले रोखे विकूं लागला आणि खरेदीदारांचे अभावीं किंमती ढासळल्या. ३½ टक्क्यांची किंमत ९० रुपयांवर घसरली आणि ह्या रोख्यांच्या किंमतीमधील चढ-उताराचा फायदा घेण्यासाठीं कित्येकांनीं सट्टेबाजी आरंभली. परंतु म्यूनिच येथील परिषदेच्या अनुकूल निकालाची बातमी येतांच ३½ टक्क्यांनीं ९८ रुपयांचा पल्ला पुन्हां गाठला. मंडळ्यांच्या भागांच्या किंमतींतहि असाच उतार आणि चढ दिसून आला. टाटा आयर्न डिफर्डचा भाव १४०५ रुपयांवरून १,२२५ रुपयांवर आणि टाटा ऑर्डिनरीचा २८९ रुपयांवरून २५५ रुपयांवर आला. इतर कंपन्यांच्या भागांची, कमी अधिक प्रमाणांत, हीच अवस्था झाली. आठवड्याचे अखेरीस शांततेच्या सुवार्तेमुळें किंमती पुनः चढल्या, परंतु त्यांनीं अद्याप पूर्वीची पातळी गांठलेली नाहीं आणि अजून किंमती स्थिरावलेल्या नाहींत. गेल्या आठवड्यांतील व्यवहारांत, विशेषतः ३½ टक्क्यांचे खरेदी-विक्रींत, कित्येक लोकांचें अतोनात नुकसान झालेलें आहे असें दिसतें. लंडन येथील रोखे बाजारांतील आंदोलनें मुंबईच्या दलाल स्ट्रीटमधील आंदोलनांपेक्षा अनेक पटींनीं मोठीं होतीं आणि पौंड-डॉलर हुंडणावळीवरहि प्रतिकूल परिणाम घडून आला होता. म्यूनिच परिषदेच्या निकालानें यक्षिणीच्या कांडीप्रमाणें मुंबई येथील बाजारावरहि आशाजनक छटा पसरली तरी अनिश्चितता अद्याप पूर्णपणें दूर झालेली नाहीं. डोक्यावरचें संकट तूर्त टळलें असलें तरी त्याच्या पुनरुद्भवाचा संभव अजून भेडसावीत आहे.

### उद्योग मंत्र्यांची परिषद

राष्ट्रीय सभेची प्रधान मंडळें ज्यांत आहेत अशा सात हिंदी प्रांतांतील उद्योग मंत्र्यांची परिषद बाबू सुभाषचंद्र बोस ह्यांच्या अध्यक्षतेखालीं दिल्ली येथें गेल्या रविवारीं भरली होती. हिंदुस्थानांत मोठमोठे कारखाने निघून उद्योग धंद्यांची वाढ झाल्यावांचून ह्या देशाची आर्थिक उन्नति होणें शक्य नाहीं आणि ह्याकरितां योजनात्मक धोरण आखल्यावांचून गत्यंतर नाहीं हें सुभाषबाबूंच्या अध्यक्षीय भाषणाचें सार होतें. ज्यांस ह्या देशांतील परिस्थिति अनुकूल आहे असे आमचे राष्ट्राच्या स्वतंत्र जीवितास अत्यावश्यक असे धंदे हिंदुस्थानांत सरकारच्या सहायानें स्थापित होण्याचें महत्त्व त्यांनीं प्रतिपादलें शेतकरी वर्गाची स्थिति सुधारण्यासहि लहानमोठ्या उद्योगधंद्यांचीं स्थापना आणि बढती अपरिहार्य आहेत हें त्यांचें विधान ध्यानांत बाळगण्यासारखें आहे. लोकांच्या प्रमुख गरजा भागवण्याचे बाबतींत स्वयंपूर्णता, औद्योगिक प्रगतीच्या मुळाशीं असलेल्या जरूरीच्या विशिष्ट धंद्यांची स्थापना, शास्त्रीय शोध, व्यावहारिक शिक्षण, राष्ट्रीय योजनात्मक धोरण आखण्यासाठीं पूर्ण चौकशी इत्यादि मुद्यांवर भर देऊन तात्काळ हातीं घेणें आवश्यक अशा कोणत्या गोष्टी आहेत ह्यांचें त्यांनीं दिग्दर्शन केलें. बाबू सुभाषचंद्र ह्यांच्या भाषणास मद्रासचे उद्योगमंत्री, श्री. गिरि, ह्यांनीं दुजोरा दिला आणि निश्चित धोरण आंखून हिंदी राष्ट्रानें उद्योगधंद्यांची स्थापना आणि जोपासना केली पाहिजे असें सांगितलें. देशी मोटारगाड्यांच्या बनावटीबाबत सर मोक्षगुंडम् विश्वेश्वर अय्या ह्यांनीं योजना तयार केली आहे तिला पाठिंबा देण्यांत यावा असेंहि त्यांनीं सुचविलें. सात प्रांतांतल्या उद्योगमंत्र्यांच्या सहविचारानें हिंदुस्थानच्या औद्योगिक उन्नतीचा प्रश्न सोडवण्याचा संघटित प्रयत्न होत आहे हें अभिनंदनीयआहे.

### रेल्वे वहातुकीचे दर आणि उद्योगधंदे

पंजाबमधील कपास कानपुरास आणण्यासाठीं घ्याव्या लागणाऱ्या रेल्वे भाड्यांत शेकडा वीस टक्के सूट न मिळाल्यास आपण रेल्वेवर बहिष्कार घालून मोटार लॉऱ्यांतून कपास आणवूं असें कानपूर येथील गिरणीवाल्यांनीं रेल्वेच्या अधिकाऱ्यांस कळविलें. कानपूर येथील गिरण्यांत तीन लक्ष गाठी कपास खपते,

त्यापैकी निम्मा पंजाबांतून येतो. हा कपास मोटार लॉर्‍यांतून आणविल्यानें रेल्वेचें वार्षिक अठरा लक्ष रुपयांचें नुकसान झालें असतें, तें टाळण्यासाठी नॉर्थ वेस्टर्न रेल्वेनें कानपूरच्या गिरणी-वाल्यांचें म्हणणें मान्य केलें आहे. ह्या रेल्वेवरील ८१ स्टेशनां-वरून कानपूर, लखनौ आणि दिल्ली येथे पाठविण्यांत येणार्‍या कपाशीचे भाड्यांत वीस टक्के सूट जाहीर झाली आहे. मुंबईहून कलकत्त्यास कापड पाठविण्यास जितका खर्च येतो, त्यापेक्षा कमी खर्च कानपूरहून कलकत्त्यास कापड पाठविण्यास वास्तविक आला पाहिजे; परंतु सध्याच्या भाड्यांचे दरांप्रमाणें तसें होत नाहीं अशी कानपूर येथील गिरणीवाल्यांची तक्रार आहे. वहातु-कीच्या दराचा मालाचे उठावावर कसा परिणाम होतो, हें वरील उदाहरणावरून समजून येईल. बंदरांतून अंतर्गत भागांत माल पाठविण्यास रेल्वे कमी भाडें आकारतें; त्याचप्रमाणें निर्गत होणार्‍या मालासहि स्वल्प भाडें पडतें. तथापि, अंतर्गत ने-आणीस त्यामानानें दरमैली अधिक आकार पडतो; त्यामुळें परदेशी मालाच्या उठावास सहाय होऊन स्वदेशी मालाची कुचं-बणा होते, ही हिंदी कारखानदारांची आणि व्यापार्‍यांची फार जुनी तक्रार आहे. रेल्वे भाड्याचे दरांत चढ-उतार करून उद्योग-धंदे तारणें अगर मारणें शक्य असतें. रेल्वेजवर हिंदी विधि-मंडळाचें नियंत्रण असण्याविषयीं लोकांची मागणी आणि रेल्वे खातें स्वतंत्र राखण्याचा ब्रिटिश सरकारचा अट्टाहास, ह्याचा उलगडा वरील खुलाशानें होईल. रेल्वेजचें वैशिष्ट्य मोटारींच्या चढाओढीमुळें कमी झालें असलें, तरी मोटार वहातुक नियंत्रण बिलानें रेल्वेजचें संरक्षण होईल अशी तरतूद केलेली आहे.

## विदेशीयांच्या प्रवेशावर बंधनें

ग्रेट ब्रिटन हें इतर राष्ट्रांत थारा न मिळणारांचें आश्रयाचें स्थान, म्हणून प्रसिद्ध आहे. सुप्रसिद्ध कार्ल मार्क्स ह्यानें ग्रेट ब्रिटनमध्येंच आपलीं पुस्तकें लिहिलीं आणि तिसर्‍या नेपोलिय-ननेंहि ब्रिटनमध्येंच विश्राम केलें. जर्मनी आणि इटली ह्या देशां-तून आतां बाहेर पडणार्‍या ज्यू लोकांस ग्रेट ब्रिटनमध्यें आपणांस सहाय मिळेल असें सहाजीकच वाटत आहे आणि हजारो ज्यू लोक ग्रेट ब्रिटनमध्यें प्रवेश मिळविण्याची खटपट करीत आहेत. तथापि, ह्या लोकांची ब्रिटिश नागरिकांबरोबर काम मिळवि-ण्याचे बाबतींत अनिष्ट स्पर्धा होते ह्या कारणाकरितां ब्रिटिश सरकार त्यांस ह्यापुढें आंत घेण्यास तयार नाहीं. प्रवेशेच्छु इसमा-विषयीं तें सरकार प्रथम चौकशी करतें आणि राजकीय अगर आरोग्य दृष्ट्या त्याचा प्रवेश अनहितकारक नसला, तर कांहीं विशिष्ट नोकरी करण्यापुरती त्यास आंत येण्यास परवानगी देतें. ह्या नोकरीसाठी ब्रिटिश नागरिक मिळत नाहीं हें नोकरी देणारास सिद्ध करून दाखवावें लागतें. विदेशी नोकरास द्यावयाचें वेतन स्थानिक नोकराचे वेतनापेक्षा कमी असणार नाहीं, असेंहि त्यास लिहून द्यावें लागतें. ह्या प्रतिबंधक अटींमुळें ग्रेट ब्रिटनमध्यें काम मिळण्याचे दृष्टीनें प्रवेश मिळविणें विदेशीयांस आतां सोपें राहिलेलें नाहीं. महायुद्धापूर्वी ग्रेट ब्रिटनमध्यें उपजीविका करण्यासाठी येणार्‍या परकीयांवर बंधनें नव्हतीं. आतां त्या देशांतच बेकारी असल्यामुळें आणि तें राष्ट्र आपल्या नागरिकांच्या रहाणीचें मान उतरूं देण्यास तयार नसल्यामुळें विदेशीयांच्या प्रवेशावर कडक निर्बंध येणें क्रमप्राप्तच होतें. हिंदुस्थानांतील रहाणीचें मान जगां-तील इतर कोणत्याहि देशाच्या मानानें कनिष्ठ असल्या कारणानें चिनी लोकांखेरीज इतर लोक येथें येण्यास उत्सुक होत नाहींत. परंतु मोठ्या पगाराच्या विदेशी "तज्ञां" ची आयात मात्र सरकारी पुरस्कारानें चालू आहे. ब्रिटिश सरकारनें विदेशीयांचे आयातीवर निर्बंध घातले आहेत, त्या स्वरूपाचीं बंधनें तिच्यावर असणें अत्यावश्यक आहे. विदेशी "तज्ञा" च्या लाय-कीचा हिंदी मनुष्य उपलब्ध नव्हता, विदेशी "तज्ञा" स तत्सम हिंदी मनुष्यापेक्षा अधिक वेतन मिळणार नाहीं, इत्यादि गोष्टी सिद्ध झाल्याविना विदेशी "तज्ञा" ची हिंदुस्थानांत नेमणूक होतां कामा नये, अशी योजना झाली पाहिजे. प्रत्यक्ष ग्रेटब्रिटन-मधील दाखल्यास अनुसरूनच वरील अटी आहेत.

## विजेच्या परवान्यांतील नवीन अटी

वीज कंपन्यांस ह्यापुढें देण्यांत यावयाच्या परवान्यांत खालील अटींचा समावेश करण्यांत येईल, असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे.

( १ ) भागीदारांस ६ टक्के दरानें डिव्हिडंड मिळाल्यानंतर राहिलेला नफा भागीदार आणि विजेचे ग्राहक ह्यांमध्यें सम प्रमा-णांत वाटण्यांत आला पाहिजे.

( २ ) कंपनीच्या बोर्डावर डायरेक्टर नेमण्याचा सरकारास अधिकार आहे.

( ३ ) कंपनीचे हिशेब तपासण्याकरितां सरकार ऑडिटर नेमील अगर कंपनीनें नेमलेल्या ऑडिटरच्या नेमणुकीस संमती देईल.

( ४ ) विजेचा धंदा करणार्‍या कंपनी खेरीज इतर कोणा-सहि हा परवाना विकणें नियमबाह्य ठरेल.

( ५ ) शेती आणि लहान उद्योगधंदे ह्यांस कोणत्या दरानें कंपनीनें वीज पुरविली पाहिजे, त्यांची कमाल मर्यादा निश्चित केली जाईल.

( ६ ) सरकारास कंपनीची मालमत्ता विकत घेण्याचा अधि-कार आहे, त्याचा उपयोग लायसेन्स प्रथम दिल्यापासून ३० वर्षांनीं अगर त्या नंतर प्रत्येक १० वर्षांनीं सरकार करूं शकेल.

( ७ ) लायसेन्स देण्यापूर्वी, कंपनी आणि तिचे मॅनेजिंग एजंट्स ह्यांमधील करार तपासून त्यांत आवश्यक त्या दुरुस्त्या करविण्याचा सरकारास अधिकार आहे.

( ८ ) जास्तींत जास्त दोन उमेदवार शिक्षणासाठी ठेवून घेणें कंपन्यांस बंधनकारक राहील.

### औद्योगिक संशोधन निधि स्थापना समारंभ

पुणें येथील रानडे इंडस्ट्रिअल ॲन्ड एकनॉमिक इन्स्टिट्यूट-मधील औद्योगिक संशोधन निधि स्थापना सोमवार ता. ३ ऑक्टो-बर रोजीं विजयादशमीचे सुमुहूर्तावर श्री. तात्यासाहेब पटवर्धन, मिरज संस्थानचे युवराज, ह्यांचे अध्यक्षतेखालीं झाली. अध्यक्षांची योजना झाल्यानंतर चिटणीस प्रो. द. बा. लिमये ह्यांनीं संस्थेचा त्रोटक वृत्तांत वाचून दाखविला आणि पुढील कार्याचें दिग्दर्शन करून निधीची आवश्यकता सांगितली. औद्योगिक संशोधन निधीकरितां मिळालेल्या देणग्या अध्यक्षांनीं जाहीर केल्या आणि समयोचित भाषण केलें. आभारप्रदर्शनानंतर समारंभ पूर्ण झाला.

### दौंड पेटा ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट असोसिएशन

शेतकी खात्यानें उपयुक्त ठरविलेलें बी-बियाणें, औषधें, खतें, वगैरे बद्दल सप्रयोग माहिती देऊन त्यांचा प्रसार करणें, ताली व बांधबंधारे ह्यांबद्दल माहिती देणें; दुय्यम धंद्यांबद्दल आणि कोंबड्यांविषयीं माहिती देणें, जनावरांची पैदास सुधारण्यासाठी वळू बैल ठेवणें, शेतकी ज्ञानाचा प्रसार करणें, एकंदरीनें शेतकरी वर्गाची उन्नति घडवून आणणें, हे वरील संस्थेचे हेतू आहेत. अहवालाचे वर्षीं ( १९३७-३८ सालीं ) मोहोळ फार्म ज्वारी आणि पुसा गहूं नं. ४ ह्यांच्या बियांचें महत्त्व शेतकऱ्यांस पटवून देण्याचा यत्न करण्यांत आला. फळझाडांची लावण, त्यांचा बहार, इत्यादींविषयीं माहिती देण्यांत आली. संस्थेजवळील ७ नांगरांचा आणि ५ पेटाऱ्यांचा उपयोग ८ गांवांतील १० शेतकऱ्यांनीं केला. ९५ रुपयांचीं कृत्रिम खतें संस्थेनें विकलीं. ताली आणि बांध ह्यांविषयींहि प्रचार करण्यांत आला. १६ गांवीं ९५ शेतकऱ्यांना चाळणीनें बी चाळून देण्यांत आलें. दौंड पेट्यासारख्या दुष्काळी भागांत संस्थेच्या कार्यास मोठा वाव आहे आणि तिला पुरेसें द्रव्यसहाय्य मिळाल्यास तिचे हातून ह्यापेक्षां अधिक कार्य होणें शक्य होईल. वरील शेतकी सुधारणा संघाचे अध्यक्ष श्री. शं. बा. इनामके हे आहेत.

### इटलीमधून ज्यू लोकांची हकालपट्टी

इटलीमधून आणि इटलीच्या नियंत्रणाखालील मुलुखांतून सर्व ज्यू लोकांची हकालपट्टी करण्यांत यावयाची आहे. पूर्व आफ्रिकेंतील इटलीच्या फक्त एका प्रदेशांत ज्यू लोकांस रहाण्यास मुभा ठेवलेली आहे.ह्या नवीन हुकुमामुळें सुमारें ५० ते ७० हजार ज्यू लोकांवर कठीण प्रसंग ओढवला आहे.इटलीमधील विश्वविद्यालयांतील १,८६४प्रोफेसरांपैकीं १७४ज्यू प्रोफेसरांवर गदा आली आहे.अरबांचें आणि ज्यू लोकांचें वाकडें आहे,त्याचा फायदा घेऊन, अरबांशीं सख्य करण्याच्या हेतूनें मुसोलिनी प्रेरित झाला असावा, अशी शंका प्रदर्शित केली जात आहे. पश्चिम आशिआ आणि उत्तर आफ्रिका ह्यांतील प्रदेशांवर मुसोलिनीचा डोळा आहेच.

### एका महिन्यांत ६४ हजार परराष्ट्रीय प्रवासी

जुलै १९३८ मध्यें ग्रेटब्रिटनला ६३,८७० परदेशी प्रवाशांनीं भेट दिली, त्यांपैकीं १८½ हजार अमेरिकन होते, १० हजार फ्रेंच होते आणि जर्मनींतून ६ हजार आले. परदेशांतून आलेले प्रवासी येतांना पैसे घेऊन येतात आणि ते ग्रेटब्रिटनमध्यें खर्चतात. म्हणजे मालाची निर्गत करावी न लागतां गिऱ्हाइकच समक्ष येऊन माल खरेदी करतात. प्रवाशांचें येणें आणि मालाची निर्गत होणें, ह्याचा परराष्ट्रीय व्यापाराचे दृष्टीनें सारखाच परिणाम होतो.

### चांदीच्या भांड्यांचा खप कसा वाढेल ?

रोजच्या वापराचीं चांदीचीं भांडीं खरेदी करण्याची ताकद असूनहि कित्येक लोक तीं विकत घेत नाहींत, ह्याचें कारण तीं स्वच्छ राखण्यासाठी नोकर ठेवणें त्यांस परवडत नाहीं, असा ग्रेट ब्रिटनमध्यें अनुभव आला आहे. चांदीच्या भांड्यांचे ऐवजीं कांचेचीं अगर चिनी मातीचीं भांडीं ते घेतात अगर इतर कोणत्या तरी मार्गानें आपला पैसा खर्चतात. चांदीची चकाकी कायम राखणाऱ्या एका युक्तीचा शोध नुकताच जाहीर झाला आहे. ही युक्ती यशस्वी झाल्यास, चांदीच्या भांड्यांस पुनः मागणी वाढेल असें म्हणतात.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

## शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ भिवंडी ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ वाई ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोला |

## खेळतें भांडवल रु. २०००००० चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरक्टर.

### मुंबई सरकारच्या पुरवणी मागण्या

मुंबई प्रांतांतील सर्व सरकारी तुरुंगांत विजेच्या पिठाच्या गिरण्या बसविण्यांत येणार आहेत. चार मध्यवर्ती तुरुंग आणि चार जिल्हा तुरुंग ह्यांत ही सुधारणा घडवून आणण्यास १४,८०० रुपये खर्च येईल. मोठ्या तुरुंगांत रेडिओ बसविण्याचें ठरलें आहे. त्यांसाठी ४,२७५ रुपये लागतील. अहमदाबाद शहराकरितां अधिक पोलिसांची आवश्यकता आहे, ती भागविण्यासाठी ४० हजार रुपयांची जरूरी आहे. बार्डोली आणि मांडवी तालुक्यांतील दारूबंदीसंबंधांतील खर्चास ३४ हजार रुपये लागतील. मुंबई शहरांत दोन प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटांच्या जागा वाढविण्यांत आल्या आहेत, त्यासाठी १६¾ हजार रुपयांचा खर्च येईल. वेंगुर्ला येथील सब-जज्जाचें कोर्ट पुनः सुरू करण्याचें सरकारनें ठरवलें आहे आणि मालवण, देवगड आणि राजापूर येथील सब-जजेस आळीपाळीनें त्या कोर्टाचें काम पहातील. परंतु त्यामुळें सरकारास चालू वर्षी १,६५९ रुपये अधिक खर्च करावा लागेल. धारवाड येथें ६¾ हजार रुपये खर्चून पाणी खेचण्यासाठी विजेचा पंप बसविण्यांत येणार आहे. प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटांच्या नवीन निर्माण केलेल्या कोर्टाकरितां पोलिस प्रॉसिक्यूटर्स, जमादार, शिपाई, इत्यादींच्या पगारांस ११¾ हजार रुपये लागतील. गोध्रा येथील सरकारी इस्पितळासाठी 'क्ष' किरण साहित्य द्यावयाचें आहे, त्याकरितां सरकार ७ हजार रुपये खर्चणार आहे. कैरा शहराचें पुरापासून संरक्षण करण्याकरितां तेथील नदींत कांहीं बांधकाम केलें, त्यास २० हजार रुपये खर्च आला. पी. डब्ल्यू. डी. च्या मंडयांचीं एकूण ६¾ लक्ष रुपयांची मागणी आहे. ह्या सर्व रकमांस असेंब्लीची मंजुरी मागण्यांत येईल.

---

### स्वदेशी चित्रपटांची हिंदुस्थानांत वाढ

हिंदी चित्रपटांच्या धंद्याची प्रगति झपाट्यानें चालली असल्याविषयीं एका ब्रिटिश मासिकांत उल्लेख आला आहे. मोशन पिक्चर सोसायटी ऑफ इंडिया ह्या हिंदी चित्रपटसंघाचा रौप्य महोत्सव लवकरच साजरा करण्यांत येणार असल्याचें सांगून त्यांतील लेखक म्हणतोः—"लहान प्रमाणावर प्रारंभ करून हा हिंदी धंदा आतां इतका वाढला आहे कीं त्यांत पस्तीस हजारांचेवर लोक काम करीत आहेत. ह्या देशांत पन्नास स्टूडिओ असून त्यांत दरवर्षी सरासरी ३५० लहान-मोठे चित्रपट तयार होतात. मोठ्या हिंदी व्यवसायांमध्यें चित्रपटांच्या धंद्याचा नंबर सातवा लागतो. चित्रपटांस वाहिलेलीं अशीं पाउणशें नियतकालिकें हिंदुस्थानांत चालत आहेत."

### केट्टा धरणीकंप फंडाचा विनियोग

केट्टा येथें ता. ३१ मे, १९३५ रोजीं पहाटे प्रचंड धरणीकंप झाला आणि त्यामुळें सुमारें २५ ते ३० हजार लोकांची प्राणहानि होऊन शहराचा पूर्णपणें नायनाट झाला. ३ जून, १९३५ रोजीं व्हाइसरॉयांनीं केट्टा मदत फंड काढला. त्यास मार्च, १९३६पर्यंत मदत मिळविण्याचें काम चालून ५४ लक्ष रुपये जमले. त्यापैकीं ३५ लक्ष रुपये २७ ऑगस्ट, १९३६पर्यंत मध्यवर्ती आणि स्थानिक कमिट्यांस वाटून टाकण्यांत आले आणि उरलेले १९ लक्ष रुपये बलुचिस्थानांतील एजंट टु दि गव्हर्नर जनरलचे स्वाधीन करण्यांत आले. ह्या रकमेपैकीं ११ लक्ष रुपये घरें पुनः बांधण्यासाठी, ५ लक्ष रुपये रिझर्व्हमध्यें ठेवण्यासाठी, २ लक्ष रुपये धार्मिक आणि सार्वजनिक इमारती पुनः बांधण्याकरितां आणि १ लक्ष रुपये केट्टा येथील मिशन इस्पितळासाठी, असा विनियोग करण्याचें ठरलें.

---

### अज्ञान मुलांच्या कॅश सर्टिफिकेटांच्या पैशाची परत फेड

अज्ञान मुलाचे नांवानें घेतलेल्या पोस्टल कॅश सर्टिफिकेटांचे पैसे तो सज्ञान झाल्यावर त्यास मिळू शकतात. त्याच्या अज्ञानावस्थेंत, कॅश सर्टिफिकेटांची किंमत ५ हजारांपेक्षां अधिक नसल्यास, त्याच्या बापास अगर बाप जिवंत नसल्यास त्याच्या आईस पैसे मिळतात. कॅश सर्टिफिकेटांची किंमत ५ हजारांपेक्षा अधिक असल्यास मुलाच्या कायदेशीर पालकासच रकम मिळूं शकते. हिंदू आणि मुसलमानी कायद्याप्रमाणें मुलाचा बाप हा आपल्या मुलाचे अज्ञानावस्थेंत त्याचा कायदेशीर पालक असतो. इतर जातींमध्यें अशी तरतूद नसल्यानें प्रत्यक्ष बापासहि तो मुलाचा कायदेशीर पालक असल्याविषयीं कोर्टाचा दाखला आणावा लागतो.

---

### क्रेसंट इन्शुअरन्स कंपनी

क्रेसंट इन्शुअरन्स कंपनीची सातवी साधारण सभा मुंबई येथें गेल्या आठवड्यांत भरली होती. अहवालाचे मुदतींत कंपनीनें उत्कृष्ट प्रगति केल्याचें अहवालावरून दिसून येतें. ३१ मार्च, १९३७ रोजीं कंपनीकडे ५ लक्ष, ६४ हजारांचे विमे चालू होते. १ एप्रिल ते ३१ डिसेंबर, १९३७ अखेर कंपनीनें ९ लक्ष रुपयांचें काम पुरें केलें. नाहींसें झालेलें भांडवल डायरेक्टरांनीं लिहून टाकलें आहे. प्रत्येक भागाची किंमत ६ रुपयांनीं कमी करण्याविषयीं कंपनीनें हायकोर्टाकडे अर्ज केला असून कोर्टानें तो मंजूर केला आहे.

सेन्ट्रल प्रॉव्हिन्सेस् ॲण्ड बेरार
प्रॉव्हिन्शिअल् कोऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.
नागपूर सिटी.
पैसे गुंतविण्यास उत्तम संधि.
गहाणी कर्जरोख्यांची तिसरी आवृत्ति
व्याजाचा दर ३¾ दरसाल दर शेंकडा ] रु. ४,००,०००. [ मुदत २५ वर्षें.
दर्शनी किंमतीस विक्री
हे कर्जरोखे सरकारी रोख्यांप्रमाणें सुरक्षित. मुद्दल व व्याजाच्या फेडीसाठीं सरकारी हमी. सहामाही व्याज.
अर्ज ४ ते १५ ऑक्टोबर १९३८ पर्यंत घेतले जातील. सविस्तर माहितीसाठीं प्रसिद्धीपत्रक (प्रॉस्पेक्टस) मागवा.
जी. ए. भोंसुले—मॅनेजर

## खऱ्या सहकाराच्या पुरस्काराची आवश्यकता

### प्रांतिक सहकारी बँकेच्या वार्षिक सभेचे वेळीं अध्यक्ष, सर चुनीलाल मेहता, ह्यांचें भाषण

मुंबई प्रांतिक सहकारी बँकेची २७ वी वार्षिक साधारण सभा २० सप्टेंबर रोजीं भरली होती, त्यावेळीं बँकेच्या बोर्डाचे अध्यक्ष, सर चुनीलाल मेहता, ह्यांनीं भागीदारांस अहवाल आणि हिशेब सादर करतेवेळीं भाषण केलें. त्यांतील महत्त्वाच्या मुद्यांचा सारांश येथें दिला आहे:—

" खुद्द सहकारी चळवळीमध्येंच जास्त पैसे गुंतविण्यास आतां वाव निर्माण झाला आहे. त्यामुळें बँकेच्या कॅश क्रेडिट्स आणि ओव्हरड्राफ्ट्सच्या रकमांत बारा लक्ष रुपयांची वाढ झाली आहे. सेंट्रल आणि अर्बन बँकांच्या पैशासहि चांगली मागणी असल्यामुळें त्यांच्या प्रांतिक बँकेकडील ठेवी वीस लक्ष रुपयांनीं कमी झाल्या आहेत.स्कूल बोर्डें आणि इतर स्थानिक संस्था ह्यांच्या प्रॉव्हिडंट फंडाच्या रकमा सरकारी कर्जरोख्यांतच गुंतविण्याची सरकारनें सक्ती केल्यामुळें स्थानिक संस्थांच्या ठेवींतहि सात लाखांचा उतार दिसून येतो."

" बँकेच्या नफ्यांत थोडी वाढ झाली, ह्याचें कारण ठेवींवरील द्याव्या लागणाऱ्या व्याजांतील उतारामुळें घ्यावयाच्या आणि द्यावयाच्या व्याजाचे दरांत अनुकूल तफावत राहिली. महाराष्ट्रांतील काळऱ्यांचे विभागामधील सोसायट्यांस दिलेल्या सवलतींमुळें हा नफा आणखी वाढूं शकला नाहीं. सोसायट्यांवरील देखरेख कडक करण्याचें बोर्डाचें धोरण आहे, त्यास अनुसरून इन्स्पेक्टरांची संख्या वाढविण्यांत येत आहे."

" ज्यांस कर्जफेड करण्याची पात्रता असूनहि इच्छा नाहीं, अशा लोकांकडे विशेष लक्ष पुरविणें आवश्यक आहे. सध्याच्या विशिष्ट परिस्थितींत दिलेल्या सवलतींचा दुरुपयोग केल्यास तो क्षम्य ठरणार नाहीं, ह्या अर्थाची सरकारी धोरणाची ताजी घोषणा सर्वांस कळून चुकली पाहिजे. खेडेगांवांतील कांहीं वजनदार लोक स्वतः वक्तशीर कर्जफेड करीत नाहींत, परंतु त्यांचेविरुद्ध कांहींच इलाजयोजना होत नाहीं. उलट तेच स्वतः सोसायट्यांचे मॅनेजिंग कमिट्यांवर आणि सुपरवायझिंग बोर्डांवर निवडून येतात. अशा लोकांस सहकारी घटनेंत स्थान मिळतां कामा नये. सोसायट्यांवरील देखरेख, त्यांची तपासणी आणि त्यांचें ऑडिट हें एकसूत्री झाल्याविना सोसायट्यांची सुधारणा होणार नाहीं. सरकारास ही गोष्ट पटलेली आहे."

"कांहीं कर्जदारांनीं शक्य ते प्रयत्न करून आपलें देणें देऊन टाकण्याचा यत्न करावा आणि कांहीं कर्जदारांनीं देणें भागविण्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष्य करावें, ही परिस्थिति सहकारी चळवळीच्या यशस्वितेचे दृष्टीनें अत्यंत गैर आहे. त्यामुळें वक्तशीर कर्जदारांसहि कर्ज मिळणें कठीण जातें. केवळ कर्ज देणें आणि तें वसूल करणें ह्याकडेच लक्ष न देतां ह्यापुढें शेतकऱ्यांमध्यें खऱ्या सहकारी तत्त्वाचें बीजारोपण करण्याचा सर्वांनीं यत्न केला पाहिजे. सध्या दिसून येणारे अनिष्ट प्रकार असेच चालू राहिल्यास, सहकारी पद्धतीनें ग्रामसुधारणा होण्याची आशा बाळगण्याचें कारण नाहीं. "

---

### पूर्व खानदेश सेंट्रल को. बँक लि., जळगांव

६०८ सोसायट्या आणि ६१९ व्यक्ती वरील बँकेचे भागीदार असून एकूण भांडवल ४ लक्ष, ५८ हजार रुपयांचें आहे. रिझर्व्ह आणि इतर फंडात मिळून ५ लक्ष, ५८ हजार रुपये आहेत. ४०½ लक्ष रुपयांच्या ठेवी बँकेकडे आहेत. बँकेनें १३ लक्ष रुपये कर्जरोख्यांत, भागांत आणि मुद्दतीच्या ठेवींत गुंतविले असून बँकेकडे ४५ लक्ष रुपयांचीं कर्जे येणें आहेत. " बँकेचा तीन वर्षांवरील थकलेला कर्जाचा आकडा फारच आटोक्यांत आला आहे. " अहवालाचे साल अखेर बँकेस १ लक्ष १६ हजार रुपये नफा झाला, त्यांतून भागीदारांस ५% दरानें डिव्हिडंड देण्याकडे २२,६५० रुपयांचा विनियोग करण्याचें ठरलें. ३० हजार रुपये फ्रोझन ॲसेट्स रिझर्व्हमध्यें टाकण्यांत आले, १५ हजार रिबेट खातीं खर्ची घातले आणि इतर फंडांतहि रकमा घालण्यांत येऊन ते वाढविले गेले. अमळनेर आणि भुसावळ येथें बँकेसाठी इमारती बांधण्याचें बोर्डानें ठरविलें आहे. अहवालाचे वर्षी रावेर येथें बँकेची शाखा व बोदवड येथें बँकेचें पे ऑफिस उघडण्यांत आलें. बँकेची वार्षिक सभा ता.२९सप्टेंबर रोजीं झाली.

---

### नाशिक जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.

वरील बँकेकडे १९३७-३८ मध्यें २⅓ लक्ष रुपये कर्जाचे १७३ अर्ज आले, त्यांपैकी प्रांतिक बँकेकडे १ लक्ष, २८ हजारांचे ८७ अर्ज मंजुरीसाठी पाठविण्यांत आले. ९३½ हजारांचे ८६ अर्ज मंजूर होऊन प्रत्यक्ष ९० ¾ हजारांचें कर्ज वाटलें गेलें. बँकेच्या स्थापनेपासून आतांपर्यंत तिनें ९८ अर्जदारांस १ लक्ष, १५ हजार रुपये कर्जाऊ दिले आहेत. या रकमेपैकी बहुतेक सर्व रकम जुनी कर्जफेड करण्यांत खर्च झाली आहे. सावकारांकडून मिळविलेल्या सुटीची रकम २५ हजार रुपये म्हणजे कर्ज रकमेच्या शेकडा २१ इतकी भरली. थक बाकीदार म्हणून एकाहि इसमाचें नांव बँकेच्या दप्तरीं नाहीं. सन १९३७-३८ मध्यें बँकेस १,३३३ रुपये नफा झाला, परंतु पहिल्या दोन वर्षांतील तोटा भरुन येण्यास ही रकम पुरेशी नसल्यानें अद्याप ५५५ रुपये इतका तोटा बँकेच्या ताळेबंदांत दिसून येतो. बँक 'ब'वर्गांत आहे. " अकरा पैकी सहा तालुक्यांतूनच बँकेकडे कर्जाचे अर्ज मुख्यतः येतात. नाशिक येथील बँकेचें ऑफिस इतर तालुक्यांस दूर पडत असावें.या दृष्टीनें,ह्या वरील भागांत एकादी स्वतंत्र बँक स्थापन करणें शक्य व सोइस्कर आहे " अशी बँकेच्या अहवालांत नोंद आहे. बँकेच्या प्रगतीची गति समाधानकारक आहे. ता. २५ सप्टेंबर रोजीं बँकेची वार्षिक साधारण सभा भरली होती.

---

### बॉंबे प्रॉ. को. बँक, लि.

वरील बँकेस ३० जून, १९३८ अखेर संपलेल्या वर्षी मागील हिशेबांतील ओढलेले २७½ हजार रुपये धरून १ लक्ष, ३६ हजार रुपये नफा झाला. त्याचा विनियोग खालीलप्रमाणें करण्याचें बँकेच्या ता. २० रोजीं भरलेल्या साधारण सभेंत ठरलें:—

| | हजार रु. |
|---|---|
| भागीदारांस डिव्हिडंड | |
| ५ % दरानें | ६५ |
| नोकरवर्गास बोनस | १५½ |
| रिझर्व्ह ( संशयित कर्जासाठीं ) | २९½ |
| पुढील वर्षांत ओढण्यासाठीं | २६ |
| | १, ३६ |

## पुना स्कूल ऑफ कॉमर्स

व्यापारी शिक्षणाची सोय करणारी एक संस्था या दृष्टीनें 'पुना स्कूल ऑफ कॉमर्स' या संस्थेचें वैशिष्ट्य पुण्यांत विशेष आहे. प्रिन्सिपॉल जी. एम. ओक, आर. ए., जी. डी. ए., एफ. आर. इ. एस. (लंडन), यांचे नेतृत्वाखाली ही संस्था चालू आहे, या संस्थेंत मॅट्रिक व नॉन मॅट्रिक यांचेसाठी डी. कॉम., ए. सी. आर. ए. (ग्लासगो) व ए. सी. सी. एस. (लंडन), या परीक्षांसाठी अभ्यास करितां येतो. पदवीधरांचेसाठी आर. ए. या परीक्षेच्या पहिल्या वर्षाचे अभ्यासाची सोय करण्यांत आली आहे. ग्रॅज्युएट व अंडरग्रॅज्युएट लोकांसाठी लंडन इंटरकॉम व बी. कॉम कोर्ससचा अभ्यास घेण्यांत येतो. इंटरमिजिएटच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची जी. डी. सी. व एल. सी. सी. डी. या परीक्षेचा अभ्यास करण्याची सोय या व्यापारी शाळेंत करण्यांत आली आहे.

लंडन युनिव्हर्सिटीच्या बी. कॉम परीक्षेचा अभ्यास करूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला एकंदर दोन वर्षे अभ्यास करून परीक्षा द्यावी लागते. इंटरमिजिएट व फायनल असे या परीक्षेचे दोन भाग असतात. अशा तऱ्हेनें इतर आणखी कांहीं पदव्यांच्या व व्यापारी डिप्लोमांच्या शिक्षणाची सोय या शाळेंत करण्यांत आली आहे.

या वर्गाची पहिली टर्म १६ जुलैपासून १५ ऑक्टोबरपर्यंत चालू असते. सकाळीं ७ पासून ९ पर्यंत हे वर्ग घेण्यांत येतात. दुसरी टर्म ११ नोव्हेंबरपासून १५ फेब्रुवारीपर्यंत भरत असते. या निरनिराळ्या डिप्लोमांची स्वतंत्र माहिती प्रि. ओक यांचेकडे (१८० बुधवार पेठ, पुणें येथें) मिळूं शकेल.

या शिक्षणासाठी बरीच किंमतवान पुस्तकें लागत असतात व तीं संस्थेच्या वाचनालयांतून १० रु. अनामत ठेवून मिळूं शकतात.

निरनिराळ्या व्यापारी शिक्षणांतील पदव्या व डिप्लोमा ह्यांसाठी प्रि. ओक यांचे नेतृत्वाखालीं आतांपर्यंत जवळजवळ ३०० विद्यार्थ्यांनीं अभ्यास केला आहे.

---

## औद्योगिक वांध्यांसंबंधीं जागतिक आकडे

जगांतील एकूण १९ देशांतील औद्योगिक वांध्यांविषयीं इंटरनॅशनल लेबर ऑफिसनें माहिती संकलित केली आहे, तीवरून १९३७ सालीं ह्या वांध्यांत ४२½ लक्ष कामगारांचा संबंध आला आणि त्यांचे ५ कोटि, ८ लक्ष कामाचे तास बुडाले, अशी माहिती मिळते. कांहीं प्रमुख देशांविषयीं आकडे खालीं दिले आहेत:—

| देश | वांधे | कामगारांची संख्या | बुडालेले दिवस |
|---|---|---|---|
| हिंदुस्थान | ३७९ | ६,४७,८०१ | ८९,८२,२५७ |
| अमेरिका | ४,७४० | १८,६०,६२१ | २,८४,२४,८५७ |
| ग्रेटब्रिटन | १,११२ | ५,९५,००० | ३४,२०,००० |
| आयर्लंड | १४५ | २६,७३४ | १७,५४,९४९ |
| झेकोस्लोव्हाकिया | ४३८ | १,२०,०५६ | ११,२८,७२० |

---

## जी. आय. पी. एम्प्लॉईज को. बँकेचा रौप्य महोत्सव

जी. आय. पी. रेल्वे एम्प्लॉईज को. बँकेचा रौप्य महोत्सव ना. मुरारजी देसाई ह्यांचे अध्यक्षतेखालीं नुकताच साजरा झाला. ह्या बँकेच्या पटावर १६,२६९ सभासद असून तिचें खेळतें भांडवल ६५ लक्ष रुपये आहे.

---

६ टक्के मासिक आंवक ठेव
डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें तारीख १-१०-३८चे आंत ठेव ठेवून फायदा मिळवा.
जनरल म्यानेजर-डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

स्वतःचे मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त "आयुर्विम्या"चे योगेंच साधतां येते.
कॉमनवेल्थ विमा कंपनी
लिमिटेड, पुणें.
ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.
ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.
रा. न. अभ्यंकर
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

दि प्रॉव्हिन्शिअल बँक
ऑफ अिण्डिया लिमिटेड
स्थापना १९३६
मुख्य कार्यालय: २२/अ, हॉस्पिटल रोड, (सी. अॅण्ड. अेम् स्टेशन) बंगलूर
शाखा: मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.
अध्यक्ष: खानसाहेब हाजी अहमद कासम, अेम. अेल. सी.
मॅ. डिरेक्टर: अेस्. पी. ठाकर.
करण्ट डिपॉझिट अकाउण्टस्: १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.
सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस्: ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. ह्या व्यवहार चेकनें करतां येतो.
कायम मुदतीच्या ठेवी: दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.
अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात.
सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.
अधिक माहिती मागवावी.
एम्. मोहन, एजंट, १७ मेनस्ट्रीट, पुणें.
एच. जी. गद्रे, एजंट, लक्ष्मीरोड, पुणें २

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |
| **सरकारी कर्जरोखे** | |
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | ११६—४ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन | १०२–१० |
| ४% १९४३ | १०७—८ |
| ३½% बिनमुदत | ९८–४ |
| ३½% १९४७–५० | १०४—८ |
| २¾% १९४८–५२ | ९९—८ |
| **निमसरकारी रोखे** | |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०९—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०८—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड ( ७० वर्षे मुदत ) | १०८—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | १११—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२२—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

| | |
|---|---|
| **बँका** | |
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% | १४०—४ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | १०७—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | २९–१२ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% | १५६०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% | ६०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | ११५—४ |
| **रेल्वेज** | |
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | १००—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% | ९७—४ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९२७—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७१७—८ |
| **वीज** | |
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% | ११७—० |
| कराची ( १०० ) ९% | १९०—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | १६५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १३००—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १३९५—० |
| **इतर** | |
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. | १८३–१२ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४२—४ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. | १९—० |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. | ३८—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ३८००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २०२—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | १५५—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. | २७१—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै | १३०९—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ७ रु. ८ आ. | १०९–१२ |

### गेल्या आठवड्यांतील बाजारभाव

| | शनि. ता. २४ | मंगळ. ता. २७ | गुरु. ता २९ | शुक्र. ता. १ |
|---|---|---|---|---|
| टाटा ऑर्डि. | २८३-० | २६३-० | २७३-० | २७१-८ |
| टाटा डिफर्ड. | १३७५-० | १२६०-० | १३२०-० | १३१२-८ |
| असो. सिमेंट | ११२-० | १०९-८ | १११-० | ११०-० |
| ३½% रोखे | ९५-१४ | ९१-२ | ९५-४ | ९८-० |

## पुणें जिल्हा कोऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लिमिटेड, पुणें शहर.

पुणें येथें तारीख १८।९।१९३८ रोजीं झालेल्या वार्षिक साधारण सभेंत खालील डायरेक्टरांचें बोर्ड निवडण्यांत आलें आहेः—

**बँकांतर्फे**

श्री. बी.एस.कामत (बाँबे प्रॉव्हिन्शिअल को.लँड मॉर्गेज बँक)

प्रो. वामन गोविंद काळे ( पुणें जि. सेंट्रल को. बँक व बाँबे प्रॉ. को. बँक )

**कर्जदार सभासदांतर्फे**

श्री. साहेबलाल मोहनलाल परदेशी चाकण, ( पश्चिम भाग )

श्री. भिकाजी बळवंत इंगळे ( पूर्व भाग )

**बिनकर्जदार सभासदांनीं निवडलेले**

श्री. गजानन महेश्वर गुप्ते, बी. ए. एलएल. बी., पुणें.

श्री. गणपत शंकर दरेकर सहजपूर.

**रजिस्ट्रार यांचे प्रतिनिधी**

नांव मागाहून जाहीर करण्यांत येईल.

चेअरमन यांची निवडणूक या निवडून आलेल्या बोर्डाकडून मागाहून करण्यांत आली.

---

## जुन्नर अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.

वरील सोसायटीची दुसरी वार्षिक साधारण सभा सोमवार ता. १२ सप्टेंबर १९३८ रोजीं भरून सन १९३८–३९ सालाकरितां पुढीलप्रमाणें निवडणुकी झाल्या.

सुपरवायझिंग कमिटी

( १ ) मे. व्ही. एम्. जोगळेकर चेअरमन, ( २ ) मे. जी. एल्. जोशी, व ( ३ ) मे. व्ही. व्ही. बोडस.

मॅनेजिंग कमिटी

( १ ) मे. वाय. बी. वैद्य चेअरमन, (२) मे.व्ही.जी.जोगळेकर, ( ३ ) मे. एस. आर. बुट्टे, ( ४ ) मे. के. आर. देशमुख, ( ५ ) मे. एम. के. भगत, ( ६ ) मे. पी. सी. गुजर, ( ७ ) मे. आर. व्ही. जोशी, मे. यू. टी. पारुंडेकर, ( १ ) मे. जी. व्ही. सखदे, व मे. पी. जी. शाळिग्राम, (ऑनररी ऑडिटर्स)

---

### नंदुरबार ता. को. सुपरवायझिंग युनियन

नंदुरबार तालुका को. सुपरवायझिंग युनियनची वार्षिक सभा ता. १७।९।३८ रोजीं भरली होती. श्री. इनामदार, ता. ऑर्गनायझर, श्री. शिंत्रे वकील लवाद ता. नंदुरबार, श्री. धारप सीनियर इन्स्पेक्टर व श्री. शहा इन्स्पेक्टर त्याचप्रमाणें बरेच सभासद तसेच डि. लो. बोर्ड मेंबर श्री. अवचीत पाटील वगैरे मंडळी सभेला हजर होती. चेअरमनचे जागेकरितां श्री. शिंत्रे व श्री. भांगरे यांमध्यें चढाओढ झाली. श्री. शिंत्रे वकील हे चेअरमनचे जागीं बहुमतानें निवडून आले.

युनियनचे सभेंत सुपरवायझर श्री. उपाध्याय,श्री.धारप सीनियर इन्स्पेक्टर व श्री. भांगरे यांची निरनिराळ्या मुद्यांवर अत्यंत कळकळीचीं व परिणामकारक भाषणें झालीं.

"सहकारी चळवळ,स्वावलंबन आणि परस्परांस सहाय्य करण्याची बुद्धी शिकवते. ही भावना धरून जर सोसायटीच्या कारभारांत सभासद जास्त लक्ष घालतील तरच सहकारी सोसायट्यांची खरी वाढ होणार आहे" हा युनियनच्या अहवालांतील शेरा सोसायटीच्या सभासदांनीं ध्यानांत बाळगणें जरूर आहे. अशा अर्थाचें निवडून आलेले चेअरमन श्री. शिंत्रे वकील यांनीं भाषण केलें.

नंतर सभेचें काम शांतपणानें पार पडल्याबद्दल नियोजित अध्यक्ष मि. बारी यांनीं सर्वांचे आभार मानले.

अप-टु-डेट शिलाई करतां

## महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा

बुधवार चौक, पुणे    १२ तासांत कपडे शिवून मिळतील.    [ खादी भांडाराचे माडीवर

## पराडकर टेलर्स ॲकॅडिमी

( सिटी पोस्टासमोर पुणें २ )

येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

**सुप्रसिद्ध संचालक मंडळ** व नामांकित व्यवहारपटु डायरेक्टर असलेल्या एका सुप्रसिद्ध विमा कंपनीकरितां **महाराष्ट्र, कर्नाटक** आणि **गोमांतक** प्रांतांत विमा शास्त्राचा पूर्ण अनुभव असलेल्या गृहस्थांना भरपूर पगार व कमिशनवर नेमणें आहे.

## दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.

( हेड ऑफिस : जळगांव )

माहिती मागवा | चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस, लक्ष्मी रोड, पुणें २




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

## झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा ]

**'अभिनंदनीय प्रगति'** असेच बोल नाशीकच्या **सह्याद्रि** विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधि व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेंत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.

लिहा अगर भेटा. | मॅनेजिंग डायरेक्टर

## सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी यांचे पेढे व वर्फी वापरा

मोती चौक : : : सातारा

## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार !
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

## K. K. & Co.

**Photographic Dealers**

**POONA.**

## S. B. JOSHI & Co.

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A. Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.